ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
www.mahaenews.com | शनिवार, दि. 05 सप्टेंबर 2026 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

# कोटलीत आंदोलक महिलांवर पाकिस्तानी सैन्याचा गोळीबार?







## राज्यभरात दहीहंडीचा थरार आणि कोट्यावधींची बक्षिसे

# गोविंदा रे गोपाळा.!

**महाईन्यूज । मुंबई**

**श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या दहीहंडी उत्सवासाठी मुंबईतील गोविंदा पथके सज्ज झाली असून, सरावाला वेग आला आहे. शासनाने यंदा ‘निर्बंधमुक्त उत्सव’ साजरा करण्याचा निर्धार केल्याने उत्साह वाढला आहे. दादर, प्रभादेवी, माहीम, वरळी, लालबाग, माझगाव आणि जोगेश्वरी परिसरात सकाळ-संध्याकाळ सराव सुरू आहे.**

ढोल-ताशांचा गजर आणि ‘गोविंदा आला रे आला’च्या जयघोषात उंच थर रचण्याचा सराव सुरू असून, संतुलन, समन्वय, वेग आणि सुरक्षिततेवर भर दिला जात आहे. अनुभवी गोविंदांकडून नव्या सदस्यांना थर रचण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे.

मुंबईतील विविध मंडळांनी लाखो रुपयांच्या बक्षिसांच्या दहीहंड्या आयोजित केल्या आहेत. प्रभादेवीतील सह्याद्री प्रतिष्ठानची हंडी, उमेश गावडे यांची चार लाखांची हंडी आणि श्रेयस पाडावे यांची साडेचार लाखांची मानाची हंडी फोडण्यासाठी अनेक पथके सज्ज झाली आहेत. विजय बजरंग, ब्राम्हणदेव, यंग प्रभादेवी आणि अमर सुभाष गोविंदा पथकांच्या कामगिरीकडे लक्ष लागले आहे.

पुण्यातही दहीहंडीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. मध्यवर्ती पेठांपासून उपनगरांपर्यंत मंडळांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. थरारक मानवी मनोरे, ढोल-ताशांचा गजर, रोषणाई आणि तरुणाईच्या उत्साहामुळे शहरात गोकुळ अवतरल्याचा भास होत आहे.

पुणे शहर व उपनगरांत १,५०० हून अधिक दहीहंडी मंडळे आहेत. लहान मंडळांचे बजेट तीन ते पाच लाख, तर मोठ्या मानाच्या हंड्यांसाठी १५ ते २० लाख रुपयांपर्यंत खर्च केला जातो. सरासरी १० लाख रुपये खर्च गृहीत धरल्यास पुण्यात सुमारे १५० कोटी रुपयांची उलाढाल होण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांत दहीहंडीला मोठ्या व्यावसायिक इव्हेंटचे स्वरूप आले आहे. मोठ्या बक्षिसांसोबत रोषणाई आणि विविध कार्यक्रमांमुळे उत्सव अधिक भव्य झाला आहे.

उत्साहासोबतच सुरक्षिततेला प्राधान्य दिले जात आहे. प्रशिक्षित मार्गदर्शक, सुरक्षा साधने आणि वैद्यकीय मदतीची उपलब्धता याकडे आयोजकांचे लक्ष आहे. मुंबई-पुण्यातील या उत्सवात उंच थर रचून कोणते पथक हंडी फोडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पुण्यात डीजेमुक्त दहीहंडीचा उपक्रम

पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना एकत्र आणत पुनीत बालन ग्रुपच्या वतीने यंदाही डीजेमुक्त दहीहंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ऐतिहासिक लाल महाल चौकात होणाऱ्या या संयुक्त दहीहंडीमध्ये यंदा तब्बल ३१ गणेश मंडळे सहभागी होणार आहेत. दोन वर्षांपासून हा संयुक्त उत्सव आयोजित केला जात असून, गतवर्षी महाराष्ट्रातील पहिली सार्वजनिक डीजेमुक्त दहीहंडी साजरी करण्यात आली होती.



> “दहीहंडी आणि गणेशोत्सव हे आपल्या संस्कृतीचा आणि परंपरेचा भाग आहेत. या उत्सवांचा आनंद मोठ्या आवाजाच्या डीजेऐवजी पारंपरिक वाद्ये, ढोल-ताशे, हलगी, मर्दानी खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातूनही तितक्याच उत्साहाने घेता येतो. गतवर्षी सुरू केलेल्या डीजेमुक्त दहीहंडीच्या उपक्रमाला यंदा मोठा प्रतिसाद मिळत आहे. दोनशेहून अधिक गणेश मंडळांनी डीजे न लावण्याचा घेतलेला निर्णय ही सकारात्मक आणि स्वागतार्ह बाब आहे. पुढील काळात पुण्यातील उत्सव अधिक पारंपरिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे व्हावेत, हा आमचा प्रयत्न आहे.’
>
> **पुनीत बालन, अध्यक्ष, पुनीत बालन ग्रुप**

### प्रमुख आकर्षणे आणि आयोजन

**सूर्यकुमार यादवची उपस्थिती :** भोसरीतील पीएमटी चौक येथे आयोजित श्री भैरवनाथ दहीहंडी उत्सवात भारतीय क्रिकेट संघाचा खेळाडू सूर्यकुमार यादव प्रथमच उपस्थित राहणार आहे.

**गोविंदा पथकांचा थरार :** शहरात विविध ठिकाणी गोविंदा पथकांकडून मानवी थर व मनोरे रचले जाणार आहेत.

**लाखोंची बक्षिसे :** विजेत्या गोविंदा पथकांसाठी राजकीय व सामाजिक मंडळांकडून भरभक्कम रोख बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत.

**नियमशिस्त व सुरक्षा :** उत्सवाचे पावित्र्य राखण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस दल पूर्णपणे सतर्क आहे.

पोलीस प्रशासनाचे कडक

**आक्षेपार्ह नृत्यांवर बंदी :** मंचावर किंवा कार्यक्रमादरम्यान अश्लील वा आक्षेपार्ह नृत्य प्रकार आढळल्यास संबंधितांवर थेट कठोर कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

**ध्वनिप्रदूषण निर्बंध :** डीजे, लाउडस्पीकर आणि लेझर लाईट्सच्या वापराबाबत प्रशासनाने दिलेले नियम पाळण्याचे आवाहन आयोजकांना केले आहे.

# पुण्याच्या ‘एचसीएमटीआर’ला वेग!

## डीपीआरला हिरवा कंदील; १० हजार कोटींच्या प्रकल्पासाठी 3 महिन्यांत अहवाल

**महाईन्यूज । पुणे**

**शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी बहुचर्चित ‘उच्च क्षमता अंतर्गत वर्तुळाकार मार्ग’ (एचसीएमटीआर) प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे नियोजन महापालिकेने सुरू केले. यासाठी पुढील तीन महिन्यांचा कालावधी लागणार असून, त्यानंतर या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे.**



हा मार्ग तयार करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विशेष आग्रही असून, त्यासाठी पुण्यासह मुंबईमध्ये वरिष्ठ पातळीवर बैठकांचे सत्र सुरू आहे. हा प्रकल्प तातडीने मार्गी लागावा, यासाठी या नियोजित प्रकल्पासाठी सल्लागार नेमणुकीची प्रक्रिया महापालिकेने सुरू केली. त्यानंतर प्रकल्पाचा डीपीआर तयार करून निविदा प्रक्रिया राबविली जाईल. या प्रकल्पासाठी चार टप्पे करण्यात येणार असून, दहा हजार कोटी रुपयांचा खर्च यासाठी होणार आहे.

शहराचा वाढता विस्तार आणि रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महापालिकेने १९८६ मध्ये शहरात ३६ कि.मी. लांबीचा एचसीएमटीआर हा उन्नत वर्तुळाकार मार्ग उभारण्याचा प्रकल्प प्रस्तावित केला होता. हा मार्ग उभारताना अत्यंत कमी प्रमाणात जागेचे भूसंपादन करावे लागणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीचा वेग वाढणार असल्याने महापालिका आयुक्त राम यांनी या प्रकल्पासाठी पुढाकार घेतला आहे. संपूर्ण प्रकल्पासाठी साधारण १० हजार कोटी रुपये अपेक्षित आहे. त्यात खासगी भूसंपादनासाठी साधारण १ हजार ३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे.

‘एचसीएमटीआर’च्या जुन्या आराखड्यात तब्बल १२ ठिकाणी बदल करण्यात आले आहेत. झोपडपट्टी, नदी आणि गर्दीच्या भागातून जाणारे काही प्रस्तावित मार्ग बदलल्यामुळे प्रकल्पाची अंमलबजावणी तुलनेने सुलभ झाल्याचा दावा प्रशासनाने केला. या मार्गाचे चार टप्पे करण्यात आले आहेत. प्रकल्पासाठी निवड करण्यात आलेल्या सल्लागाराला डीपीआर तयार करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी देण्यात येणार आहे. ‘संपूर्ण ‘एचसीएमटीआर’चा एकत्रित डीपीआर तयार केला जाणार असला, तरी अंमलबजावणीच्या दृष्टीने प्रत्येक पॅकेज स्वतंत्र तयार केले जाणार आहे,’ असे प्रकल्प विभागाचे प्रमुख दिनकर गोजारे यांनी सांगितले.

### भूसंपादन लवकर होण्याची शक्यता

‘एचसीएमटीआर प्रकल्पाच्या मार्गासाठी राज्य शासनाच्या आणि महापालिकेच्या जागा मोठ्या प्रमाणात असल्याने भूसंपादनाला फार कालावधी लागणार नाही. हा उन्नत मार्ग असल्याने राज्य सरकारच्या मालकीच्या जागांमधून हा रस्ता जात आहे. त्यासाठी एकदाच परवानगी घ्यावी लागणार आहे. यामध्ये विघ्न येऊ नयेत यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवश्यक त्या सूचना राज्य सरकारच्या विविध विभागांना दिल्या आहेत. या मार्गामध्ये महापालिकेच्या हद्दीतून हा रस्ता जाताना वडगावशेरी येथील १४७ जणांची घरे जाणार आहेत. त्यांचे पुर्नवसन केले जाणार आहे,’ असे राम यांनी सांगितले.

# महापालिकेच्या नवजात अतिदक्षता विभागांसाठी होणार व्हेंटिलेटरची खरेदी!

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे महानगरपालिकेने शहरातील विविध भागात असलेल्या महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये व्हेंटिलेटर खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. स्थायी समितीच्या बैठकीमध्ये याबाबतचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाकडून मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्याला मान्यता देण्यात आल्याचे स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले.**




महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालय, राजीव गांधी रुग्णालय आणि चंदुमामा सोनवणे प्रसूतिगृहातील नवजात अतिदक्षता विभागांसाठी (एनआयसीयू) १० नवीन व्हेंटिलेटर आणि १० सीपीएपी मशीनची खरेदी करण्यात येणार आहेत. यामुळे महापालिकेच्या रुग्णालयांची क्षमता वाढणार असून, त्याचा फायदा सर्वसामान्य रुग्णांना होणार आहे. ही यंत्रसामग्री खरेदीसाठी ३ कोटी ९८ लाख रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे.

महापालिका प्रशासनाने हा प्रस्ताव ठेवला होता. स्थायी समितीच्या बैठकीत त्याला मंजुरी देण्यात आल्याचे समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. भिमाले म्हणाले, ‘महापालिका रुग्णालयांमध्ये नवजात बालकांसाठी आवश्यक असलेल्या व्हेंटिलेटरची कमतरता असल्याने गंभीर अवस्थेतील बालकांना अनेकदा ससून रुग्णालयात पाठविले जाते. त्यामुळे पालक आणि नातेवाईकांची धावपळ होण्याबरोबरच महापालिका रुग्णालयांच्या सुविधांबाबत नाराजी व्यक्त केली जाते.’

खासगी रुग्णालयांमधील उपचारांचा वाढता खर्च लक्षात घेता महापालिका रुग्णालयांमध्येच अद्ययावत सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे प्रशासनाने प्रस्तावात म्हटले होते. महापालिकेच्या अर्थसंकल्पात उपकरणे व यंत्रसामग्रीसाठीच्या १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामधून ३ कोटी ९८ लाख ५० हजार रुपये खर्च ही यंत्रसामग्री घेण्यासाठी केला जाणार आहे.

महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये उपचार घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक आहेत. खाजगी रुग्णालयांच्या उपचारांचे दर सर्वसामान्य नागरिकांना परवडत नसल्याने गोरगरीब नागरिकांना कमी खर्चात महापालिकेच्या रुग्णालयामध्ये उपचार मिळतात. त्यामुळे पालिकेच्या रुग्णालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांची संख्या अधिक आहे. यामध्ये लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांचा समावेश असतो. सध्या महापालिका रुग्णालयांच्या एनआयसीयु मध्ये व्हेंटिलेटर ची संख्या कमी आहे. त्यामुळे महापालिकेचा आरोग्य विभाग उपचारासाठी आलेल्या रुग्णाला ससून हॉस्पिटलमध्ये जाण्यास सांगतात. यामुळे संबंधित रुग्णाच्या कुटुंबीयांना आणि नातेवाईकांना मनस्ताप सहन करावा लागतो. ससून मध्ये गेल्यानंतरही व्हेंटिलेटर मिळेल की नाही? याची शाश्वती नसते. त्यामुळे अनेकदा खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी रुग्णांना दाखल व्हावे लागते. खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी होणारा खर्च हा मोठा असल्याने गोरगरीब आणि सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक ते उपचार मिळत नाही.

महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांची संख्या आणि त्यांची आवश्यकता लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाचे व्हेंटिलेटर खरेदीचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवला होता. हा प्रस्ताव मान्यतेसाठी आल्यानंतर त्यावर सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर रुग्णांच्या फायद्यासाठी याची खरेदी करण्याचा निर्णय घेतल्याचे स्थायी समिती अध्यक्ष भिमाले यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये 'पिंक टॉयलेट'ला ग्रीन सिग्नल

## स्वच्छ आणि सन्मानजनक सुविधांना प्राधान्य; पठारे यांची सभागृहात आग्रही भूमिका

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील महिलांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि सन्मानजनक सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने 'पिंक टॉयलेट'च्या संकल्पनेला सभागृहात सकारात्मक प्रतिसाद मिळाला. सर्वसमावेशक सार्वजनिक स्वच्छता धोरणाला मान्यता देताना महिलांच्या गरजा लक्षात घेऊन पिंक टॉयलेटची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती राणीमाई अशोक पठारे यांनी केली.**



> "पिंक टॉयलेट ही केवळ महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची संकल्पना नाही, तर त्यांच्या सुरक्षिततेचा, स्वच्छतेचा आणि सन्मानाचा विषय आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील प्रत्येक महिलेला सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित आणि स्वच्छ स्वच्छतागृहाची सुविधा मिळाली पाहिजे. सर्वसमावेशक सार्वजनिक स्वच्छता धोरणाला मान्यता मिळाल्याने आता प्रशासनाने त्याची प्रभावी अंमलबजावणी करून शहरातील पिंक टॉयलेट्सची नियमित देखभाल, तपासणी आणि तक्रारींचे तातडीने निराकरण करावे. महिलांसाठी सुरक्षित आणि सन्मानजनक सुविधा उपलब्ध करून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे."
>
> - राणीमाई अशोक पठारे, सभापती, महिला व बालकल्याण समिती, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

महिला व बालकल्याण समितीच्या वतीने सभागृहाचे लक्ष वेधताना राणीमाई पठारे म्हणाल्या की, "महिलांसाठी सुरक्षित आणि स्वच्छ पिंक टॉयलेट्स ही आजच्या काळाची गरज आहे. महिलांना सुरक्षित, स्वच्छ आणि सन्मानजनक सुविधा मिळणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे."

पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वसमावेशक सार्वजनिक स्वच्छता धोरणाला दि. २९ जुलै २०२६ रोजी स्थायी समितीने मान्यता दिली आहे. त्यामुळे हे धोरण केवळ कागदावर न राहता त्याची ठोस आणि प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे पठारे यांनी स्पष्ट केले.

शहरातील प्रत्येक सार्वजनिक स्वच्छतागृहाची नियमित तपासणी करावी, स्वच्छतेचा दर्जा कायम ठेवावा तसेच नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे तातडीने निराकरण करावे, अशी मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली. पिंक टॉयलेटच्या विषयावर सभागृहात चर्चा सुरू असताना अनेक नगरसेवकांनीही या उपक्रमाला समर्थन देत त्याचे स्वागत केले.

महिलांसाठी स्वतंत्र आणि सुरक्षित स्वच्छतागृहांची उपलब्धता ही केवळ सुविधा नसून महिलांच्या सुरक्षिततेशी, आरोग्याशी आणि सन्मानाशी संबंधित बाब आहे. त्यामुळे शहरातील सार्वजनिक स्वच्छता व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासनाने धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी सभागृह आणि प्रशासनाचे आभार मानताना राणीमाई पठारे यांनी पिंपरी-चिंचवडला महिलांसाठी अधिक सुरक्षित आणि सुविधायुक्त शहर बनविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची भूमिका व्यक्त केली.

# पिंपरी-चिंचवड गणेशोत्सवापूर्वी खड्डेमुक्त करा; काटेंची आयुक्तांकडे मागणी



### गणेशोत्सवापूर्वी रस्ते खड्डेमुक्त करा

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरातील प्रमुख रस्ते, अंतर्गत मार्ग, गणेश मंडळांच्या मिरवणुकीचे मार्ग तसेच विसर्जन मार्गांची तातडीने पाहणी करून खड्डे बुजवावेत. आवश्यक ठिकाणी डांबरीकरण व रस्ते दुरुस्तीची कामे गणेशोत्सवापूर्वी पूर्ण करावीत. उत्सव काळात नागरिकांची मोठी गर्दी आणि वाहनांची वाढणारी वर्दळ लक्षात घेता रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघात तसेच वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांची सुरक्षितता आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी महापालिका प्रशासनाने संबंधित विभागांना स्पष्ट सूचना देऊन युद्धपातळीवर कार्यवाही करावी, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी केली आहे.

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व रस्ते तातडीने खड्डेमुक्त करून आवश्यक दुरुस्तीची कामे पूर्ण करावीत, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

गणेशोत्सव काळात शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि विसर्जन मार्गांवर भाविक, नागरिक तसेच वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ वाढत असते. मात्र शहरातील विविध भागांमध्ये रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या खड्ड्यांमुळे वाहतुकीचा वेग मंदावून कोंडी होण्याची शक्यता असून दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना अपघाताचा धोका वाढला असल्याचे काटे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

गणेशोत्सव हा आनंद आणि भक्तीचा उत्सव असून या काळात रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे कोणत्याही नागरिकाला अपघाताला सामोरे जावे लागू नये, ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे शहरातील सर्व प्रमुख आणि अंतर्गत रस्त्यांची तातडीने पाहणी करून खड्डे बुजविण्याचे काम हाती घ्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच गणेश मंडळांच्या मिरवणूक मार्गांवरील रस्ते, विसर्जन मार्ग, प्रमुख चौक आणि गर्दीच्या ठिकाणांची विशेष तपासणी करून आवश्यक ठिकाणी डांबरीकरण व रस्ते दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करावीत, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गणेशोत्सवाच्या काळात वाहतुकीला कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, नागरिकांना सुरक्षितपणे प्रवास करता यावा आणि रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे अपघात घडू नयेत यासाठी संबंधित विभागांना स्पष्ट सूचना देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी नाना काटे यांनी केली आहे.

"गणेशोत्सव निर्विघ्न, सुरक्षित आणि आनंददायी होणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे हा विषय केवळ नियमित काम म्हणून न पाहता नागरिकांच्या जीविताशी संबंधित महत्त्वाचा विषय म्हणून गांभीर्याने घेऊन गणेशोत्सवापूर्वी शहर खड्डेमुक्त करावे," असे आवाहनही त्यांनी महापालिका प्रशासनाला केले आहे.



## भूमिका

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर डीजेच्या वापराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. पुण्यात ध्वनिप्रदूषणाला विरोध करणाऱ्यांवर हल्ले होत असताना नागपुरात पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी घेतलेला निर्णय निश्चितच विचार करायला लावणारा आहे. गणेशोत्सव, नवरात्र, दसरा-दिवाळी यांसारखे सण आनंदाने साजरे व्हावेत.**

# डीजेचा दणदणाट थांबविण्याची वेळ आली!




मात्र त्याच वेळी ध्वनिमर्यादेचेही पालन व्हावे, या भूमिकेतून नागपुरात मल्टिलेअर डॉल्बी साउंडसह मोठ्या आवाजाच्या ध्वनिव्यवस्थेवर निर्बंध घालण्यात आले. उत्सव आणि सार्वजनिक आरोग्य यांचा समतोल साधण्याचा हा प्रयत्न आहे. पुण्यात मात्र डीजेच्या धोकादायक आवाजाला विरोध करणाऱ्या विद्यानंद बापट यांच्यावर झालेला हल्ला अत्यंत निषेधार्ह आहे.

मतभेद असतील तर त्यावर चर्चा, युक्तिवाद आणि लोकशाही मार्गाने तोडगा काढता येतो. परंतु एखाद्याचे म्हणणे पटत नाही म्हणून त्याच्यावर हात उचलणे, ही लोकशाहीची नव्हे तर झुंडशाहीची भाषा आहे. धार्मिक भावना महत्त्वाच्या असल्या तरी त्या इतरांच्या स्वातंत्र्य, आरोग्य आणि सुरक्षिततेपेक्षा मोठ्या ठरू शकत नाहीत. डीजेचा प्रश्न केवळ मनोरंजनाचा नाही; तो सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. अतितीव्र आवाजामुळे श्रवणशक्तीवर परिणाम होऊ शकतो, रक्तदाब आणि हृदयविकाराचा धोका वाढू शकतो. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती, नवजात बालके आणि गर्भवती महिलांसाठी मोठ्या आवाजाचे दुष्परिणाम अधिक गंभीर असू शकतात. माणसांबरोबरच प्राणी-पक्ष्यांनाही या कर्णकर्कश आवाजाचा त्रास होतो. त्यामुळे ध्वनिमर्यादा पाळणे म्हणजे उत्सवविरोध नव्हे, तर जबाबदार नागरिकत्व आहे.

दुर्दैवाने उत्सवांचे वाढते बाजारीकरण आणि त्याभोवती निर्माण झालेले राजकारण हा या प्रश्नाचा आणखी एक गंभीर पैलू आहे. वर्षभर विविध सण-उत्सवांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांची गर्दी सक्रिय ठेवण्याची राजकीय गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे ध्वनिप्रदूषणाचे दुष्परिणाम माहीत असूनही काही नेते कठोर भूमिका घेण्यास टाळाटाळ करतात. एका बाजूला उत्सवांचे पावित्र्य आणि साधेपणा जपण्याची भाषा करायची आणि दुसऱ्या बाजूला कार्यकर्त्यांच्या दबावापुढे वैज्ञानिक नियमांकडे दुर्लक्ष करायचे, हा दुतोंडीपणा थांबला पाहिजे. पुण्याची ओळख वाद-संवाद, विचार आणि मतभिन्नतेतून मार्ग काढण्याची आहे. त्यामुळे पुण्यातील वाद हा मारामारीपर्यंत पोहोचणे ही पुण्याच्या परंपरेलाच काळिमा फासणारी बाब आहे. डीजे वाजवण्याचे स्वातंत्र्य असेल, तर तो आवाज नको असलेल्या नागरिकांनाही शांततेत जगण्याचा अधिकार आहे.

एका व्यक्तीचा उत्सव दुसऱ्याच्या आरोग्याची किंमत मोजून साजरा होऊ शकत नाही. गणरायाची खरी आराधना मोठ्या आवाजात नव्हे, तर विवेकाच्या आवाजात आहे. नागपूरने घेतलेला निर्णय पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रासाठी दिशादर्शक ठरू शकतो. आता प्रश्न एवढाच—डीजेच्या दणदणाटापेक्षा नागरिकांच्या आरोग्याचा आणि विवेकाचा आवाज मोठा करण्याचे धाडस पुणे कधी दाखवणार?

## प्रासंगिक »

### छोटा दिवा

**एका गावात गणू नावाचा लोहार राहत होता. त्याच्या दुकानात मोठी भट्टी होती. एकदा गावकऱ्यांनी त्याला विचारले, "तुझ्याकडे कोळसा, लाकूड आणि लोखंड भरपूर आहे; मग गावासाठी लागणारी अवजारे वेळेवर का तयार होत नाहीत?"**

गणू म्हणाला, "सामग्री भरपूर आहे, पण भट्टी पेटवण्यासाठी योग्य व्यवस्था नाही." त्याने दुसऱ्या दिवशी भट्टीची दुरुस्ती केली. हवा खेळती राहण्यासाठी नवी नळी बसवली आणि इंधन योग्य प्रमाणात वापरले. भट्टी पेटताच कामाचा वेग वाढला. काही दिवसांत गावातील शेतकऱ्यांना आवश्यक असलेली अवजारे तयार होऊ लागली.

गावातील एका वृद्धाने गणूला सांगितले, "साधनसंपत्ती असणे पुरेसे नसते. तिचा योग्य उपयोग करण्याची क्षमता आणि व्यवस्था असेल तरच ती संपत्ती विकास घडवते." गणूला ही गोष्ट मनापासून पटली. त्याने पुढे प्रत्येक कामात आधी साधनांची उपलब्धता आणि त्यानंतर त्यांचा योग्य वापर याकडे लक्ष दिले.

- तात्पर्य : साधनसंपत्ती मिळवणे महत्त्वाचे; पण तिचा योग्य उपयोग करण्याची व्यवस्था उभी करणे त्याहून महत्त्वाचे.

उझबेकिस्तानसोबत युरेनियमच्या दीर्घकालीन पुरवठ्याचा करार होणे ही भारताच्या अणुऊर्जा क्षेत्रासाठी निश्चितच स्वागतार्ह बाब आहे.

## इंधनाची चिंता मिटली, आता भट्टी उभारणीची वेळ

वाढती अर्थव्यवस्था, औद्योगिकीकरण आणि भविष्यातील विजेची गरज लक्षात घेता ऊर्जा सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागणार आहे. भारताला खनिज तेल, कोळसा आणि युरेनियमसारख्या महत्त्वाच्या ऊर्जास्रोतांसाठी मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे विविध देशांशी दीर्घकालीन इंधन करार करणे ही काळाची गरज आहे. उझबेकिस्तानशी असलेले ऐतिहासिक आणि मैत्रीपूर्ण संबंध या करारामुळे आणखी दृढ होण्याची शक्यता आहे.



मध्य आशियातील देशांना चीन, रशिया आणि पाश्चात्त्य देशांमधील बदलत्या समीकरणांच्या पार्श्वभूमीवर विश्वासार्ह व्यापारी भागीदारांची गरज आहे. भारतासाठीही ही बाजारपेठ आणि ऊर्जा सहकार्याची मोठी संधी आहे. त्यामुळे युरेनियम करार हा केवळ इंधनाचा व्यवहार न मानता व्यापक रणनीतिक संबंधांचा भाग म्हणून पाहायला हवा.मात्र खरी समस्या पुढे आहे. इंधन मिळाले, पण ते वापरण्यासाठी नव्या अणुभट्ट्या किती उभारल्या जाणार? भारताने अणुइंधनाचा पुरवठा निश्चित करण्यासाठी अनेक देशांशी करार केले. अमेरिकेसोबतचा अणुकरार हा त्यातील महत्त्वाचा टप्पा होता. यामुळे जुन्या अणुभट्ट्यांची कार्यक्षमता वाढली; पण त्यानंतर अपेक्षित वेगाने नवे अणुऊर्जा प्रकल्प उभे राहिले नाहीत. त्यामागे अणुदुर्घटना, नुकसानभरपाई आणि विमा दायित्वाचे गुंतागुंतीचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरले. भारताची अणुऊर्जा क्षमता आजही एकूण वीजनिर्मितीच्या तुलनेत अत्यल्प आहे. विकसित भारताचे स्वप्न साकार करायचे असेल, तर ही स्थिती बदलावी लागेल. २०४७ पर्यंत मोठ्या प्रमाणावर अणुऊर्जा निर्मितीचे लक्ष्य निश्चित केले असेल, तर त्यासाठी केवळ घोषणा नव्हे, तर ठोस अंमलबजावणी आवश्यक आहे. या संदर्भात थोरियमवर आधारित तंत्रज्ञानही महत्त्वाचे ठरते. भारताकडे थोरियमचे मोठे साठे आहेत. कल्पक्कम येथील फास्ट ब्रीडर रिॲक्टरमधील प्रगती आशादायी आहे.

मात्र थोरियमचा व्यावसायिक आणि व्यापक वापर अद्याप तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक आहे. त्यामुळे भविष्यातील स्वदेशी अणुऊर्जेसाठी संशोधन सुरू ठेवतानाच सध्या युरेनियमचा पुरवठा सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे. कोळशावर आधारित वीजनिर्मितीमुळे पर्यावरणीय प्रश्न निर्माण होतात, तर सौर आणि पवनऊर्जेच्या बाबतीत साठवणुकीचे आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षित आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अणुऊर्जा हा भारतासाठी महत्त्वाचा पर्याय ठरू शकतो. म्हणूनच उझबेकिस्तानकडून युरेनियम मिळणे ही सुरुवात आहे, शेवट नव्हे. इंधनाची बेगमी झाली; आता नव्या, सुरक्षित आणि सक्षम अणुभट्ट्यांची उभारणी वेगाने झाली पाहिजे. अन्यथा इंधन हातात असूनही ऊर्जा निर्मितीची 'भट्टी' प्रतीक्षेतच राहील.

## ।। अभंगवाणी ।।



योगाचें तें भाग्य क्षमा ।
आधीं दमा इंद्रियें ॥१॥

अवघीं भाग्यें येती घरा ।
देव सोयरा जालिया ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुंबई पाण्याखाली जाणार?

## संयुक्त राष्ट्राचा मोठा इशारा; शहर कायमचे पाण्याखाली जाण्याचा दावा

**महाईन्यूज । मुंबई**

**समुद्राच्या पाणीपातळीचा स्तर वाढत असल्यामुळे दक्षिण आशियातील अनेक शहरे पाण्याखाली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. यापैकी मुंबई हे एक शहर असल्याचे सांगितले जात आहे. संयुक्त राष्ट्राच्या एका नव्या अहवालानुसार, किनारी भागात राहणाऱ्या १.४ कोटी लोकांना पाणी पातळी वाढल्याचा फटका बसू शकतो. ज्यामुळे त्यांच्या विस्थापनाचा धोका निर्माण झाला आहे.**



३१ ऑगस्ट रोजी संयुक्त राष्ट्राच्या महासभेत "चॅलेंजेस रिलेटेड टू सी लेव्हल राईज अँड वेज अँड ॲप्रोचेस टू अॅड्रेस" हा अहवाल सादर करण्यात आला. या अहवालात मुंबई, कोलकाता आणि ढाका या शहरांचा उल्लेख करण्यात आला आहे. वाढत्या समुद्र पातळीमुळे शहरांना आर्थिक नुकसानासह मोठ्या प्रमाणात मानवी विस्थापनाच्या संकटाचा सामना करावा लागू शकतो, असे त्यात नमूद केले आहे.

या अहवालानुसार, २०२४ मध्ये समुद्राच्या पातळीत ५.९ मिमीच्या विक्रमी दराने वाढ झाली. त्यापूर्वी २०१४ ते २०२३ या काळात ४.७ मिमीच्या सरासरीने दरवर्षी समुद्र पातळीत वाढ झाली होती.

अहवालात नमूद केल्यानुसार, उत्सर्जन कमी करण्यासाठी आतापासून आक्रमक पावले उचलली तरी २१०० पर्यंत जागतिक समुद्र पातळी कमीत कमी ०.५ मीटरने वाढू शकते. पश्चिम अंटार्क्टिकातील बर्फाच्या आवरणाची सर्वात वाईट परिस्थिती ओढवली तर समुद्र पातळीत दोन मीटरपर्यंत वाढ होऊ शकते. ज्यामुळे किनारपट्टीच्या भागांमध्ये अत्यंत गंभीर घटना घडू शकतात.

दक्षिण आशियातील काही सखल त्रिभुज प्रदेशातील शहरे जसे की, कोलकाता, मुंबई आणि बांगलादेशमधील ढाकामध्ये मोठ्या प्रमाणावर मानवी वस्तीचे विस्थापन करावे लागू शकते. ज्यामुळे १.४ कोटी लोकांना त्याचा फटका बसू शकतो. शहरे पाण्याखाली गेल्यामुळे येथील लोकांना कायमस्वरुपी आपले घर गमवावे लागू शकते, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

मेरीलँड विद्यापीठाचे निवृत्त प्राध्यापक आणि आयआयटी मुंबईचे अभ्यागत प्राध्यापक, हवामान शास्त्रज्ञ रघु मुर्तुगुड्डे यांच्या विधानाचा हवाला द इंडियन एक्सप्रेसने दिला आहे. शास्त्रज्ञ रघु मुर्तुगुड्डे म्हणाले की, मुंबई तीन बाजूंनी समुद्राने वेढलेली आहे. मुंबईच्या भौगोलिक रचनेमुळे आणि बदलत्या हवामानामुळे धोका वाढला आहे.

### मुंबईत भूस्खलन आणि खारे पाणी घुसण्याचा धोका

मुंबईसाठी मोठा धोका असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. कारण शहरात भूस्खलन आणि समुद्राचे खारे पाणी शहरात शिरल्यामुळे मोठी हानी होऊ शकते. यामुळे किनारी भागातील भूजल स्त्रोत आणि विहिरी दूषित होऊ शकतात. समुद्रातून उठणाऱ्या मोठ्या लाटांमुळे स्वच्छता व्यवस्था, गृहसंकूल आणि वाहतूक व्यवस्था यासारख्या पायाभूत सुविधांवर दबाव येऊ शकतो.

### ८० टक्के भाग पाण्याखाली येऊ शकतो?

संयुक्त राष्ट्रांचे मूल्यांकन हे मुंबई महानगरपालिकेने २०२१ साली प्रसिद्ध केलेल्या मुंबईच्या हवामान कृती योजनेतील इशाऱ्याशी मिळतेजुळते आहे. या योजनेनुसार, २०५० पर्यंत मुंबईचा ८० टक्के भाग पाण्याखाली जाऊ शकतो. तसेच पुढील तीन दशकांत मुंबई आणि भारतातील इतर ११ किनारी शहरांमध्ये समुद्राची पातळी ०.१ ते ०.३ मीटरने वाढण्याचा अंदाजही वर्तवण्यात आला होता.

# शिवसेना पक्ष अन् चिन्हाबाबत उद्धव ठाकरेंचं मोठं वक्तव्य

**महाईन्यूज । बीड**

**गेल्या काही महिन्यांपासून शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून कपिल सिब्बल आणि देवदत्त कामत यांनी सर्वोच्च न्यायालयात जोरदार युक्तिवाद केला आहे. आता शिवसेना शिंदे गटाकडून मुकुल रोहतगी हे युक्तीवाद करत आहेत. त्यामुळे लवकरच शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबतचा निर्णय लागण्याची शक्यता आहे.**



या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर बोलताना आज (४ ऑगस्ट) उद्धव ठाकरे यांनी एक महत्वाचं वक्तव्य केलं आहे. उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी आज बीड जिल्ह्यातील शिवसेना (ठाकरे) पक्षाचे २५० कार्यकर्ते (बीएलए) मुंबईत आले होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत पक्ष संघटनेच्या कामाचा आढावा घेतला. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी महत्वाचं भाष्य करत 'नावाचा दुरुपयोग करणारे बरेचजण आहेत. पण आपण आता त्यांचा समाचार घेत असून लवकर त्याचा निकाल लागेल', असं म्हटलं आहे.

"सध्या नावाचा दुरुपयोग करणारे बरेचजण आहेत. त्यांचा समाचार आपण घेत चाललेलो आहोतच. आता त्याचा निकाल देखील लवकरच लागेल अशी आपल्याला खात्री आहे", अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी या संदर्भात बोलताना दिली आहे.

"आज बीएलए म्हणून तुमच्यावर महत्वाची जबाबदारी आहे. सध्या भाजपा अतिशय खालच्या पातळीवर जाऊन डावपेच खेळतं आहे आणि निवडणुका जिंकत आहे. या बोगस मतदार नोंदणीबाबत पहिल्यांदा आवाज कोणी उठवला होता तर परकला प्रभाकर यांनी उठवला होता. त्यांनी सांगितलं होतं की लोकसभा ते विधानसभा या दरम्यान ४५ लाख मतदार जास्त नोंदवले गेले. मग ते कुठून आले होते? आणि आता एसआयआरमध्ये २ कोटी मतदार वगळले गेले आहेत", असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी भाजपावर जोरदार टीका केली.

### 'बीड जिल्हा भगवा करण्याची आपल्याला संधी': ठाकरे


"तुम्ही सर्व बीड विधानसभा मतदार संघामधून आलेला आहात. तुम्ही सर्व एका मतदारसंघामधून बीएलए या ठिकाणी आलेला आहात. त्यामुळे तुमच्या सर्वांचं कौतुक आहे. बीड म्हटल्यानंतर आधी आपली आणि भाजपाची युती होती, खरं तर तेव्हाची ही युती फार वेगळी होती. आता सारखं तेव्हा नव्हतं. त्यामुळे तेव्हा त्यांच्या प्रेमाखातर बीड जिल्ह्यातील बऱ्याच जागा आपण भाजपाला सोडल्या होत्या. त्याचा परिणाम असा झाला की त्यामुळे बीडमधील आपलं अस्तित्व हळहळू कमी होत गेलं. मात्र, आता पुन्हा एकदा बीड जिल्हा भगवा करण्याची संधी आपल्याला आली आहे", असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# नेपाळमध्ये शोधकार्य सुरूच

## हजारो घरांच्या पुनर्बांधणीचे आव्हान; अजूनही ५,०८३ जण बेपत्ता; १,२५९ मृत

**महाईन्यूज । नेपाळ**

**नेपाळमध्ये पुरामुळे झालेल्या प्रचंड नुकसानामुळे पुनर्वसनासाठी मोठ्या प्रमाणात निधी लागणार असल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे. पूरग्रस्त भागामध्ये सुमारे २० हजार घरांची पुनर्बांधणी करणे आवश्यक असल्याचे अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले. त्रिशुली नदीच्या परिसरात आणि खोऱ्यामध्ये, तसेच अन्य ठिकाणी मोठ्या प्रमाणात मालमत्तेची हानी झाली आहे.**





दरम्यान, पुरानंतर नवव्या दिवशीही शोध, बचाव व मदत कार्य सुरू आहे. मृतांचा आकडा १,२५९ झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. तसेच अजूनही ५,०८३ जण बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू असल्याचे सांगण्यात आले. अपर त्रिशुली ३अ जलविद्युत केंद्र आणि अन्य जलविद्युत प्रकल्पांच्या बोगद्यांमध्ये अडकलेल्या कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी गुरुवारी काहीशी प्रगती झाल्याचे दिसले.

नेपाळच्या 'नॅशनल डिझास्टर रिस्क रिडक्शन अँड मॅनेजमेंट ऑथॉरिटी'चे (एनडीआरआरएमए) प्रमुख धर्मराज उप्रेती यांनी सांगितले की, "आमच्या अंदाजानुसार ७,५०० घरे पूर्ण नष्ट झाली आहेत, ती एकतर पुराच्या पाण्यात वाहून गेली किंवा ढिगारा व चिखलाखाली गाडली गेली." त्याबरोबरच, पुराच्या पाण्यातून वाचलेली अनेक घरेही आता राहण्यासारखी राहिलेली नाहीत. त्यामुळे जवळपास २० हजार घरे अन्यत्र, सुरक्षित ठिकाणी बांधावी लागतील, असे उप्रेती म्हणाले.

### तेराव्या दिवशी राष्ट्रीय शोकदिन!

पंतप्रधान बालेन शहा यांच्या नेतृत्वाखालील नेपाळच्या मंत्रिमंडळाने पुराच्या १३व्या दिवशी, ७ सप्टेंबरला राष्ट्रीय शोकदिन जाहीर केला आहे. दुसरीकडे, अनेक स्थानिकांनी आपले बेपत्ता आप्तेष्ट जिवंत सापडण्याची आशा सोडून दिली असून त्यांचे प्रतीकात्मक अंत्यविधी केले आहेत. रसुवा, नुवाकोट, धडिंग, चितवन आणि नवलपारसी पूर्व या जिल्ह्यांमध्ये नेपाळी लष्कराचे ९,३००पेक्षा अधिक सैनिक बेपत्ता व्यक्तींचा शोध घेत आहेत.

# बेल्जियमच्या पंतप्रधानांशी भेटीदरम्यान मोदींकडून जीडीपी दरवाढीची प्रशंसा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारताच्या विकासातून जगाला आत्मविश्वास मिळत असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केले. भारत दौऱ्यावर आलेले बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट द वेव्हर यांच्याबरोबरच्या भेटीदरम्यान मोदी यांनी जीडीपी दरवाढीची प्रशंसा केली. तसेच यातून जगाला संधी मिळत असल्याचे मत व्यक्त केले.**



दोन्ही देशांनी व्यापार, संरक्षण, दुर्मीळ खनिजे, प्रदूषणरहित ऊर्जा आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्याचा विस्तार करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. पंतप्रधान मोदी आणि बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट द वेव्हर यांच्यादरम्यान नवी दिल्ली येथे व्यापक चर्चा झाली. त्यानंतर प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनामध्ये दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यावर सहमती झाल्याचे सांगितले.

यावेळी पंतप्रधान मोदी यांनी पहिल्या तिमाहीत देशाने जीडीपी वाढीचा ७.८ टक्के दर गाठल्याचा मुद्दा अधोरेखित केला. भारताचा विकास हा जगासाठी विश्वासाचा स्रोत आणि आणि नव्या संधी असल्याचे त्यांनी नमूद केले. तर, भारत-युरोपीय महासंघ मुक्त व्यापार करार हा प्रमुख टप्पा असून भारत व बेल्जियम पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात व्यापक आणि सामरिक संबंध वाढवत असल्याचे बार्ट द वेव्हर यांनी सांगितले.

मोदी म्हणाले की, "आज जग मोठ्या उलथापालथीच्या कालखंडातून जात आहे. अनेक भागातील संघर्ष कायम आहे. अन्न, इंधन, पुरवठा साखळी अशा प्रत्येक क्षेत्रावर अनिश्चिततेचा परिणाम होत आहे." भारत आणि बेल्जियमदरम्यान संरक्षण आणि सुरक्षा सहकार्य हे एकंदर संबंधांचे महत्त्वाचे स्तंभ आहेत, असे मोदींनी यावेळी सांगितले. "आमचे सरकार आणि संरक्षण उद्योगांमधील करारांमुळे संरक्षण सहविकास आणि सह-उत्पादन यामध्ये अनेक संधी खुल्या होतील," असे पंतप्रधानांनी यावेळी नमूद केले. सेमिकंडक्टरच्या क्षेत्रात बेल्जियमचे नैपुण्य आणि भारताची व्याप्ती एकमेकांना पूरक असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेल्या वर्षी बेल्जियमच्या राजकुमारी ॲस्ट्रिड यांच्या नेतृत्वाखाली बेल्जियन इकॉनॉमिक मिशनचे शिष्टमंडळ भारत दौऱ्यावर आले होते. त्यावेळी दोन्ही देशांदरम्यान जवळपास ४० करार झाले होते. वेव्हर यांचा दौरा त्याच सहकारवृद्धीचा पुढचा भाग मानला जात आहे.




> "या आव्हानात्मक परिस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेने आपली गती कायम राखली आहे. गेल्या तिमाहीत जीडीपी वाढीचा दर ७.८ टक्के नोंदवला गेला. आज भारताच्या विकासातून जगाला आत्मविश्वास आणि नव्या संधी मिळत आहेत.
>
> - नरेंद्र मोदी, पंतप्रधान

### द्विपक्षीय व्यापाराची स्थिती

बेल्जियम हा युरोपमधील भारताचा महत्त्वाचा आर्थिक भागीदार देश आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात दोन्ही देशांदरम्यानचा व्यापार १३ अब्ज डॉलरपेक्षा अधिक होता. बेल्जियममधील अँटवर्प हे जागतिक हिरे व्यापाराचे केंद्र असून द्विपक्षीय हिरे व्यापारात त्याचे महत्त्वाचे स्थान आहे. त्याशिवाय बेल्जियममधून भारतात लक्षणीय प्रमाणात गुंतवणूक होते. एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२५ या कालावधीत त्या देशातून भारतात ४.२ अब्ज डॉलरची थेट परकीय गुंतवणूक झाली होती.

# एनटीआरच्या ‘ड्रॅगन’मध्ये शाहिद कपूरची एन्ट्री?



ज्युनियर एनटीआरच्या बहुचर्चित ड्रॅगन चित्रपटाची चर्चा आहे. हा चित्रपट पुढील वर्षी रिलीज होणार असून चित्रपटाचे चित्रीकरण सुरू आहे. मात्र, चित्रपटातील एका ॲक्शन सीनचे चित्रीकरण करताना अभिनेता ज्युनिअर एनटीआरला दुखापत झाली होती. यामुळे त्याने चित्रीकरणातून काही दिवस विश्रांती घेण्याचा निर्णय घेतला आहे. अशातच या चित्रपटाविषयी एक महत्वाची अपडेट समोर आली आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, या चित्रपटात बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्टची एन्ट्री झाल्याची माहिती समोर आली होती. आता अभिनेता शाहिद कपूर देखील ड्रॅगचा भाग असणार असल्याचे वृत्त आहे. हा चित्रपट ११ जून २०२७ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी चित्रपटाचा फर्स्ट लूक रिव्हील करण्यात आला होता. हा लूक पाहून चित्रपटाविषयी चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे.

साऊथ अभिनेत्री रुक्मिणी वसंत या चित्रपटात महत्वाच्या भूमिकेत झळकणार आहे. एका रिपोर्टनुसार, बॉलिवूड अभिनेते शाहिद कपूर आणि आलिया भट्ट या चित्रपटाचा भाग असणार आहेत. दोघांच्या विशेष भूमिका चित्रपटात असतील. मात्र, शाहिद कपूरच्या अधिकृत एन्ट्रीबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. तसेच चित्रपटातील निर्मात्यांनीही शाहिदच्या चित्रपटातील प्रवेशाची अधिकृतपणे पुष्टी केलेली नाही.

आलिया भट्ट आणि ज्युनियर एनटीआर यांनी यापूर्वी ‘आरआरआर’ या चित्रपटात एकत्र काम केले आहे. ते दुसऱ्यांदा एकमेकांसोबत स्क्रिन शेअर करताना दिसणार आहेत. ‘ड्रॅगन’मध्ये बिजू मेनन, खुशबू सुंदर, गुरू सोमासुंदरम, राजीव कनाकाला, अनिल कपूर आणि आशुतोष राणा यांसारखे कलाकारांच्या भूमिका आहेत.

शाहिद कपूरच्या कामाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास, तो शेवटचा ‘कॉकटेल २’ या चित्रपटात दिसला होता. ज्यात क्रिती सॅनॉन आणि रश्मिका मंदाना सह-कलाकार होत्या. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी केली. याशिवाय तो त्याच्या आगामी ‘फर्जी’ या वेबसीरिजच्या दुसऱ्या सीझनची तयारी करत आहे.



# खुशी पुन्हा प्रेमात?

श्रीदेवी आणि बोनी कपूर यांची धाकटी मुलगी खुशी कपूर पुन्हा एकदा तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. ‘द आर्चीज’ मधील तिचा सहकलाकार वेदांग रैना याच्यासोबतच्या ब्रेकअपनंतर आता ती पुन्हा एकदा प्रेमात पडल्याची चर्चा सुरू झाली आहे. खुशी तिचा बालपणीचा मित्र आणि एक्स बॉयफ्रेंडला पुन्हा डेट करत असल्याचे सांगितले जात आहे. खुशी कपूर एक्स बॉयफ्रेंड आकाश मेहताबरोबर नात्यात असल्याचं समोर आलं आहे. माहितीनुसार, वेदांग आणि खुशीचे नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच ब्रेकअप झालं. ते जवळपास दोन वर्षे नात्यात होते. वेदांगबरोबर ब्रेकअप झाल्यानंतर खुशीला खूप त्रास झाला आणि यातून बाहेर पडण्यासाठी तिला काही काळ लागला, मात्र, आता ती यातून सावरली आहे. आता ती आकाशबरोबर आनंदी असून, तिला दुसऱ्या कोणत्याही अभिनेत्याला डेट करायचं नाही. खुशीचे अनेक जवळचे मित्र आणि कुटुंबातील सदस्यही इन्स्टाग्रामवर आकाशला फॉलो करतात. यामध्ये जान्हवी कपूर, अनन्या पांडे, ओरी, अर्जुन कपूर, अंशूला कपूर, शिखर पहारिया, नव्या नवेली नंदा आणि शनाया कपूर यांचा समावेश आहे. कामाबद्दल बोलायचं झाले तर, खुशी कपूरने २०२३ मध्ये नेटफ्लिक्सवर रिलीज झालेल्या झोया अख्तरच्या ‘द आर्चीज’ या चित्रपटातून आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली होती, ज्यामध्ये तिने बेटी कूपरची भूमिका साकारली होती. त्यानंतर खुशी लवकरच तिची आई श्रीदेवी यांच्या ‘मॉम’ या चित्रपटाच्या सिक्वेलमध्ये दिसणार आहे. यामध्ये करिश्मा तन्ना देखील मुख्य भूमिकेत आहे.



# साय-फाय ॲक्शन थ्रिलरमध्ये प्रियांका

प्रियांका चोप्रा हॉलिवूडची मोठी स्टार झाली आहे. बॉलिवूडमध्ये ओळख निर्माण केल्यावर तिने आंतरराष्ट्रीय चित्रपटांमध्ये काम केले आणि आता ही ‘देसी गर्ल’ विदेशी चित्रपटांमध्ये यशाची पताका फडकवत आहेत. प्रियांकाच्या नव्या चित्रपटाची आता घोषणा झाली आहे. द ब्लफ आणि हेड्स ऑफ स्टेटनंतर प्रियांकाने आगामी साय-फाय ॲक्शन थ्रिलर ‘ब्ल्यूफ्लाय’ चित्रपटासाठी करार केला आहे. या चित्रपटात तिच्यासोबत ऑस्कर विजेता अभिनेता रसेल क्रो मुख्य भूमिकेत असणार आहे. प्रियांकाने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट करत या चित्रपटाविषयी माहिती दिली आहे. ब्ल्यूफ्लाय या चित्रपटाचे दिग्दर्शन निम्रोद एंटल करणार आहे. तर चित्रपटाची कहाणी डेव्हिड फ्रिगेरियोश विलियम यूबँक आणि कार्लाइल यूबँक यांनी लिहिली आहे. बॅक-टू-बॅक हॉलिवूडपटांदरम्यान प्रियांका ही भारतीय चित्रपटसृष्टीतही पुनरागमन करत आहे. एस.एस. राजामौली यांचा चित्रपट ‘वाराणसी’द्वारे ती भारतीय चित्रपटसृष्टीत कमबॅक करणार आहे. या चित्रपटाचे चित्रिकरण सध्या सुरु आहे. या चित्रपटात ती महेशबाबू आणि पृथ्वीराज सुकुमारन यांच्यासोबत मुख्य भूमिका साकारत आहे. चित्रपटातील तिचा लुकही समोर आला असून त्याला चाहत्यांची पसंतीही लाभली आहे.

# रोहितनं चिडून निर्णय घेतला होता!

## रोहित शर्माचा लॉर्ड्सवरील सामना हा शेवटचा सामना असणार; बातमी वाऱ्यासारखी पसरली

**महाईन्यूज । पाकिस्तान**

**इंग्लंड दौऱ्यावर असताना रोहित शर्माच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला पूर्ण विराम लागणार होता. लॉर्ड्समध्ये झालेल्या शेवटच्या वनडे सामन्यापूर्वी एक बातमी वाऱ्यासारखी पसरली होती. रोहित शर्माचा लॉर्ड्सवरील सामना हा शेवटचा सामना असणार अशी ती बातमी होती. रोहित शर्मा यापूर्वीच कसोटी आणि टी २० क्रिकेटमधून निवृत्त झाला आहे. त्यामुळं आता त्याची आंतरराष्ट्रीय कारकीर्द जवळपास संपुष्टात येणार अशी स्थिती निर्माण झाली होती.**




मात्र त्यावेळी बीसीसीआय सचिव जेवजीत सैकिया यांनी या वृत्ताचं खंडन करत रोहित निवृत्त होणार नाही असे सांगितलं होतं. रोहितने देखील लॉर्ड्सवर शतकी खेळी करत आपल्या टीकाकारांना प्रत्युत्तर दिलं होतं. रोहितने लॉर्ड्सवर १३८ धावांची धडाकेबाज खेळी केली होती. वनडेमध्ये लॉर्ड्सवर शतक ठोकणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला होता.

बीसीसीआय सचिव सैकिया यांनी, 'रोहित शर्माच्या भविष्याबाबत माध्यमांमध्ये जे काही सुरू आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की रोहितबाबत अशी कोणतीही चर्चा झालेली नाही. रोहित भारतीय वनडे संघाचा नियमीत सदस्य असून तो जोपर्यंत संघात आहे तोपर्यंत तो देशाचे प्रतिनिधित्व करणार. दुसऱ्या शब्दात तो लॉर्ड्स सामन्यांतर वनडेमधून निवृत्त होणार नाही.'

बीसीसीआयने नुकतेच एक रिव्ह्यू मिटिंग घेतली. त्यात भारतीय संघाचे दोन्ही कर्णधार शुभमन गिल आणि श्रेयस अय्यर, कोच गौतम गंभीर, निवडसमिती चेअरमन अजित अगरकर बोर्डाचे सचिव देवजीत सैकिया यांची समावेश होता. या वर्षाच्या सुरूवातीला आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यावर संघाच्या झालेल्या खराब कामगिरीवर तसेच वनडे वर्ल्डकपच्या रोडमॅपबाबत चर्चा झाली.

या बैठकीत रोहित शर्मा, विराट कोहली आणि रविंद्र जडेजा यांचा पुढच्या वर्षी होणाऱ्या वनडे वर्ल्डकपमध्ये समावेश असणार की नाही याची गेल्या काही काळापासून जोरदार चर्चा सुरू आहे. विराट कोहली आणि जडेजावर लगेच टांगती तलवार नाहीये. मात्र रोहित शर्मा खेळेल की नाही याबाबत खात्री देता येत नाहीये.

### रोहित निवृत्तीसाठी तयार होता

दरम्यान, आता पीटीआयने दिलेल्या एका वृत्तानुसार रोहित शर्माला एका निवडसमिती सदस्याने याबाबतचा निरोप दिला होता. निवडसमिती चेअरमन यांनी रोहितला हा निरोप दिला नाही. त्यांनी निवडसमितीने आता आम्ही भविष्याकडे पाहत आहोत असं सांगितलं होतं. याचा अर्थ आता रोहित निवडसमितीच्या स्कीमचा भाग नव्हता. रोहितला तू इंग्लंड दौऱ्यावेळी लॉर्ड्समध्ये वनडे क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा करणार का अशी देखील विचारणा करण्यात आली होती. मात्र भारताच्या या वरिष्ठ फलंदाजाने आणि त्याच्या जवळच्या व्यक्तींनी याबाबत गप्प राहणंच पसंत केलं.

# स्मृती मानधना जगात भारी! मेग लेनिंगला मागे टाकत रेकॉर्ड केला

**महाईन्यूज । बेंगळुरू**

**दुबईत सध्या महिला एशिया कप २०२६ स्पर्धेचा थरार सुरू आहे. या स्पर्धेत गुरूवारी झालेल्या सामन्यात भारत आणि हॉंगकॉंग हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात स्मृती मानधनाची बॅट चांगलीच तळपली. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाने १९३ धावांचा डोंगर उभारला होता. यापैकी १२४ धावा या स्मृती मानधनाने केल्या होत्या.**




### स्मृतीने पहिल्या षटकापासून हॉंगकॉंगच्या गोलंदाजांचा समाचार घेतला

सलामीला फलंदाजीसाठी आलेल्या स्मृतीने पहिल्या षटकापासून हॉंगकॉंगच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. स्मृती आणि शफालीने ६० धावांची भागीदारी करून दमदार सुरूवात करून दिली. शफाली २८ धावांवर माघारी परतल्यानंतर, स्मृतीने एकहाती किल्ला लढवला. प्रतिका रावल अवघ्या १० धावा करून माघारी परतली. तर ऋचा घोष ११, हरमनप्रीत कौर १० धावा करून माघारी परतली. पण स्मृतीच्या शतकी खेळीच्या बळावर भारतीय संघाने १९३ धावांपर्यंत मजल मारली. तिच्या आक्रमक फलंदाजीमुळे भारताने अखेर हॉंगकॉंगसमोर विजयासाठी १९४ धावांचे आव्हान उभे केले.

भारतीय संघाने हा सामना १३७ धावांच्या मोठ्या फरकाने जिंकून एकतर्फी विजयाची नोंद केली. या शतकी खेळीच्या बळावर स्मृती मानधनाने दमदार शतकी खेळी केली आहे.

दुबईतील दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर पार पडलेल्या या सामन्यात सलामीला आलेल्या स्मृतीने हॉंगकॉंगच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. तिने या डावात ६४ चेंडूंचा सामना करत १२४ धावांची खेळी केली. ही तिच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील १८ वी शतकी खेळी ठरली यासह आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं झळकावणाऱ्या महिला फलंदाजांच्या यादीत ती अव्वल स्थानी पोहोचली आहे. याआधी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं झळकावण्याचा रेकॉर्ड हा ऑस्ट्रेलियाची स्टार फलंदाज मेग लेनिंगच्या नावावर होता. लेनिंगच्या नावे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १७ शतकं झळकावली आहेत. यासह दक्षिण आफ्रिकेची स्टार फलंदाज लॉरा वॉल्डवॉर्टच्या नावेही आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १७ शतकं झळकावण्याची नोंद आहे.

हॉंगकॉंग संघाला हा सामना जिंकण्यासाठी १९४ धावांचा डोंगर सर करायचा होता. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या हॉंगकॉंगचा डाव अवघ्या ५६ धावांवर आटोपला. हॉंगकॉंगकडून एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. नताशा मिल्सने १५, तर मरीनाने १४ आणि आणि यास्मिनने ११ धावा केल्या. या तिघांना वगळलं, तर इतर कुठल्या फलंदाजांना दुहेरी आकडा देखील गाठता आला नाही. या दमदार विजयासह भारतीय संघाने स्पर्धेतील आपली विजयी वाटचाल कायम ठेवत प्रतिस्पर्धी संघांना मजबूत इशारा दिला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
। शनिवार ।
दि. 05 सप्टेंबर 2026 ।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# शहरातील नव्या प्रभागांना सक्षम यंत्रणा द्या

## अधिकारी, सफाई व फवारणी कामगारांसह आवश्यक सामग्रीचे तातडीने वाटप करण्याची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेने नवीन प्रभाग रचना जाहीर केली असली, तरी त्यानुसार अद्याप प्रभागनिहाय अधिकारी, सफाई कामगार, फवारणी कामगार तसेच आवश्यक साधने व उपकरणांचे योग्य नियोजन आणि वाटप झालेले नाही. त्यामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्था आणि कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. नवीन प्रभागांची निर्मिती केवळ कागदावर न राहता त्या प्रभागांना सक्षम मनुष्यबळ आणि आवश्यक यंत्रणा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे, अशी मागणी नगरसेवक राहुल कलाटे यांनी केली.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या २ सप्टेंबर रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत कचरा आणि स्वच्छता व्यवस्थेच्या प्रश्नावर भूमिका मांडताना राहुल कलाटे यांनी प्रशासनासमोर महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले.

शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे स्वरूप वेगवेगळे असून त्यानुसार त्याचे संकलन, वर्गीकरण, प्रक्रिया आणि विल्हेवाट यांचे नियोजन होणे आवश्यक आहे. त्यामुळे कचऱ्याच्या प्रश्नाकडे केवळ एखाद्या परिसराचा प्रश्न म्हणून न पाहता संपूर्ण पिंपरी चिंचवड शहराचा प्रश्न म्हणून एकात्मिक पद्धतीने उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे कलाटे यांनी स्पष्ट केले.

मोशी येथील कचरा डेपोचे नियोजन ज्या काळात (१९९१ साली) करण्यात आले, त्या वेळी हा परिसर शहराच्या मुख्य नागरी वस्तीजवळ नसलेला आणि तुलनेने विरळ लोकवस्तीचा भाग होता. मात्र, ताथवडे-पुनावळे परिसरात कचऱ्याच्या आरक्षणाचा विचार होत असताना आजची परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. आज हा परिसर मोठ्या प्रमाणावर विकसित झालेला आणि घनदाट नागरी वस्तीचा भाग आहे. त्यामुळे पूर्वीचे निर्णय आणि आजची परिस्थिती यांची तुलना करताना वस्तुस्थिती लक्षात घेणे गरजेचे आहे.

"कचऱ्याच्या जागेवरून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा नागरिकांच्या आरोग्याचा, सुरक्षिततेचा आणि भविष्यातील शहर नियोजनाचा विचार करून निर्णय घेतले पाहिजेत. आजची परिस्थिती काय आहे, भविष्यात शहराचा विस्तार कसा होणार आहे आणि नागरिकांच्या हितासाठी कोणता पर्याय योग्य आहे, याचा सर्वंकष विचार झाला पाहिजे," असे राहुल कलाटे यांनी सांगितले. कचऱ्याचा प्रश्न हा मोशीचा, पुनावळेचा किंवा कोणत्याही एका भागाचा प्रश्न नाही; तो संपूर्ण पिंपरी चिंचवडचा प्रश्न आहे. त्यामुळे पक्षीय किंवा स्थानिक राजकारण बाजूला ठेवून शहर म्हणून त्यावर कायमस्वरूपी आणि शास्त्रीय उपाययोजना करण्याची गरज आहे. लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण मिळवून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असेही कलाटे यांनी स्पष्ट केले.

नवीन प्रभागांना सक्षम यंत्रणा, योग्य मनुष्यबळ आणि आवश्यक साधनसामग्री देऊन स्वच्छता व्यवस्थेचे तातडीने नियोजन करावे आणि कचरा व्यवस्थापनासाठी संपूर्ण शहराचा एकात्मिक आराखडा तयार करावा, अशी मागणी राहुल कलाटे यांनी महापालिका प्रशासनाकडे केली.

### मोशी की पुनावळे कचरा प्रश्नावर राजकारण नको

मोशी येथील दुर्दैवी दुर्घटनेनंतर कचरा डेपोच्या जागेवरून सुरू असलेल्या राजकारणावरही राहुल कलाटे यांनी स्पष्ट भूमिका मांडली. ते म्हणाले, "कचऱ्याच्या प्रश्नावर नागरिकांची दिशाभूल करणारे राजकारण करण्यापेक्षा त्या त्या वेळची परिस्थिती समजून घेणे आवश्यक आहे."

# महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पवना धरणावर जलपूजन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराला वर्षभर पुरेसा आणि सुरळीत पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणाने पूर्ण क्षमतेने पाणीसाठा गाठल्यानंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पारंपरिक पद्धतीने जलपूजन करण्यात आले. महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते जलपूजन करून जलदेवतेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी शहराला वर्षभर पुरेसा, नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा व्हावा, यासाठी प्रार्थना करण्यात आली.**



पवना धरण हे पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे जलस्रोत आहे. यंदा धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने समाधानकारक परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जलपूजनाच्या माध्यमातून जलस्रोतांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासोबतच पाण्याचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा संदेश देण्यात आला.

जलपूजनाच्या निमित्ताने जलस्रोतांचे संवर्धन, पाण्याचा काटकसरीने वापर, नदीपात्राची स्वच्छता आणि जलपरिसराचे संरक्षण करण्याचा संकल्प करण्यात आला. पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून शहराच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची गरज असल्याने उपलब्ध जलसाठ्याचे जतन करणे आणि त्याचा योग्य वापर करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

जलपूजनाचा कार्यक्रम पर्यावरणपूरक पद्धतीने पार पाडण्यात आला. धरण परिसर तसेच नदीपात्र स्वच्छ ठेवणे, जलप्रदूषण टाळणे आणि जलस्रोतांच्या स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. पवना नदी व धरण परिसराची स्वच्छता आणि जलस्रोतांचे संरक्षण यासाठी नागरिकांनीही सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले.

पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेता भविष्यातील पाणी व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी जलस्रोतांचे नियोजनबद्ध संवर्धन, पाण्याची बचत आणि उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर यावर भर देणे आवश्यक आहे. यासाठी महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून विविध उपाययोजना राबविण्यात येत असून नागरिकांनीही पाणी बचतीच्या सवयी अंगीकाराव्यात, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता महेश बरीदे, जलसंपदा विभागाचे रजनीश भारिया यांच्यासह पिंपरी-चिंचवड शहर व परिसरातील पत्रकार बंधू-भगिनी, महापालिका अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. जलपूजनाच्या माध्यमातून पाण्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतानाच 'पाणी वाचवा, जलस्रोत जपा आणि भावी पिढ्यांसाठी जलसुरक्षित शहर घडवा' हा संदेश देण्यात आला.

# कासारवाडी, फुगेवाडी रेल्वे फाटक बंद साठी हालचाली

## नागरिकांच्या सोयीसाठी अंडरपास उभारण्याची खासदार श्रीरंग बारणेंची सूचना

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**कासारवाडी आणि फुगेवाडी येथील रेल्वे फाटक बंद करण्याच्या प्रशासकीय हालचाली सुरू असताना स्थानिक नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी रेल्वे आणि महापालिका अधिकाऱ्यांसह दोन्ही ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी केली. कासारवाडी येथील रेल्वे फाटकाच्या जागेवर भुयारी मार्ग उभारण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.**





कासारवाडी गाव रेल्वे मार्गामुळे दोन भागांत विभागले गेले आहे. गावातील स्मशानभूमी आणि शाळा रेल्वे मार्गाच्या दुसऱ्या बाजूला असल्याने नागरिकांसह शाळकरी विद्यार्थ्यांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही समस्या लक्षात घेऊन खासदार बारणे यांनी रेल्वे फाटकाच्या परिसराची पाहणी केली. यावेळी रेल्वे विभागाचे शुभम निकम, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सहशहर अभियंता प्रेरणा शिनकर, कार्यकारी अभियंता विजय भोजने, नगरसेविका मनीषा लांडे, प्रतीक्षा जवळकर, माजी नगरसेवक शाम लांडे, प्रकाश जवळकर यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

जोपर्यंत अंडरपासचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी रेल्वे प्रशासनाने आवश्यक सहकार्य करावे, अशी विनंतीही बारणे यांनी केली. फुगेवाडीतील पाहणीवेळी नगरसेवक राजू बनसोडे, माजी नगरसेविका उषा वाखारे, युवासेना जिल्हाप्रमुख सागर पाचरणे, शिवसेना पिंपरी-चिंचवड शहर संघटक निलेश हाके, मनोज वाखारे, यशवंत वाखारे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

कासारवाडी आणि फुगेवाडी येथील अंडरपासची कामे पूर्ण झाल्यानंतर नागरिकांचा ये-जा करण्याचा मार्ग अधिक सुकर होणार असून, रेल्वे फाटक बंद करण्यामुळे निर्माण होणारी गैरसोयही कमी होईल, असे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले.

### फुगेवाडीतील अंडरपासच्या कामाचीही पाहणी

फुगेवाडी येथे स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी प्रस्तावित अंडरपासच्या कामाचीही खासदार बारणे यांनी पाहणी केली. हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

## पिंपरी-चिंचवडमध्ये 'मॅग्रम'चे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर; मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते उद्घाटन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडच्या औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्षेत्राला आणखी मोठी चालना देणाऱ्या द मॅग्नम आईसक्रीम कंपनीच्या ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (GCC) चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्राच्या कोनशिलेचे अनावरणही मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले.**




या ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरच्या माध्यमातून कंपनीच्या जागतिक स्तरावरील विविध व्यावसायिक आणि कार्यात्मक गरजांना तांत्रिक व व्यवस्थापकीय सहाय्य उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडच्या औद्योगिक पट्ट्याला जागतिक कंपन्यांच्या गुंतवणुकीसाठी आणखी एक महत्त्वाचे स्थान मिळण्यास मदत होणार आहे. उद्घाटनप्रसंगी आमदार अमित गोरखे, आमदार शंकर जगताप, द मॅग्नम आईसक्रीम कंपनीचे कार्यकारी संचालक (CFO) अभिजित भट्टाचार्य, कंपनीचे मध्य पूर्व, तुर्की आणि दक्षिण आशियाचे अध्यक्ष तोलोय तानरिदाग्ली यांच्यासह कंपनीचे अधिकारी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

> “पिंपरी-चिंचवडमध्ये ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरची सुरुवात होणे ही शहराच्या औद्योगिक आणि सेवा क्षेत्राच्या वाढत्या सामर्थ्याची पावती आहे. महाराष्ट्रात गुंतवणूक, रोजगार आणि नव्या तंत्रज्ञानाच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्य सरकार सातत्याने प्रयत्नशील आहे. जागतिक कंपन्यांनी महाराष्ट्राला पसंती देत आपल्या विस्तारासाठी येथे गुंतवणूक करावी, यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य सरकारकडून केले जाईल.”
>
> - देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री.

### पिंपरी-चिंचवडच्या औद्योगिक क्षमतेला जागतिक व्यासपीठ

पिंपरी-चिंचवड हे पारंपरिक उत्पादन उद्योगासोबतच आता आधुनिक सेवा, तंत्रज्ञान आणि जागतिक व्यावसायिक केंद्रांसाठीही महत्त्वाचे ठिकाण म्हणून विकसित होत आहे. मॅग्नम आईसक्रीम कंपनीच्या GCC मुळे या प्रवासाला आणखी बळ मिळणार असून, शहराची जागतिक औद्योगिक ओळख अधिक दृढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालेल्या या उद्घाटनामुळे पिंपरी-चिंचवडमध्ये आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या विस्तारासाठी पोषक वातावरण निर्माण होत असल्याचा संदेशही अधोरेखित झाला.

# फॉरेव्हर २० एका शिक्षिकेचे मनोगत



**प्रत्येकाचे वय त्याच्या जन्मदिनी वाढत असते, पण माझे वय वाढतच नाही. ते वर्षानुवर्षे वीसच आहे कारण मी एक शिक्षिका आहे. माझ्या अवतीभवती कायम विशीतीलच मुले असतात ज्यांच्या डोळ्यात स्वप्ने आहेत, अवखळपणा आहे, काही तरी करून दाखवण्याची उमेद आहे. मी कायम विशीतच राहणार आहे कारण मी याच वयातील मुलांना शिकवते. खरेतर प्रत्येक वर्षी मला माझे विद्यार्थीच कसे जगायचे शिकवत असतात. त्यांच्या पिढीला काय हवे आहे ते सांगतात.**




पटलं नाही तर वाद घालतात. मी त्यांची शिक्षिका असल्याने कित्येक वेळा निमूटपणे ऐकतातही . पण त्यांच्या डोळ्यातून, हालचालीतून मला त्यांचे विचार कळतात. काही वेळा मी दुर्लक्ष करते कारण मला दिलेला सिलॅबस पूर्ण करायचा असतो. तीही जबाबदारी मला पार पडायची असते.

कुणी तरी मला विचारले की "तेच तेच शिकवण्याचा कंटाळा येत नाही का तुला"? यावर माझे उत्तर असते की जरी मी तेच तेच शिकवते तरी विद्यार्थी दर वर्षी नवीन असतात, त्यांची आकलनशक्ती वेगळी असते. एकाच वर्गात अतिहुशार, हुशार आणि सर्वसामान्य असे सर्वजण एकत्र बसतात. अश्या सर्वांना एकत्र बांधून विषय शिकवण्याची जबाबदारी माझ्यावर असते. एखादी बॅच अभ्यासू असते तर एखादी त्या मुलांच्या व्रात्यपणामुळे लक्षात राहते. त्यामुळे प्रत्येक वर्षी त्यांना शिकवण्याची पद्धत बदलत असते. मागच्या वर्षी हा टॉपिक शिकवताना असे असे घडले होते, हा भाग नीट समजला नव्हता किंवा मलाही नीट समजून सांगता आला नव्हता, हे आठवते आणि मी त्याप्रमाणे बदल करत असते. माझा विषय स्थापत्य अभियांत्रिकी. सतत सर्वांच्या नजरेसमोर बांधकाम घडत असते, त्यामुळे त्यातील थोडेफार ज्ञान सर्वांना असतेच. शिवाय बऱ्याच मुलांच्या घरचा व्यवसाय हा या क्षेत्राशी निगडित असतो. त्यामुळे त्यांना वेगळे काहीतरी सांगण्याची जबाबदारी माझ्यावर असते. प्रत्येक तास मनोरंजक व्हावा यावर भर द्यावा लागतो नाहीतर पंधराव्या मिनिटाला समोर बसणारी मुले वेगळ्याच दुनियेत गेली स्पष्टपणे दिसत असतात. मग एखाद्या मुलाला उठवायचे, थोडे रागवायचे, प्रश्न विचारायचे असले प्रकार करावे लागतात. तेव्हाच समजावे की आता थोडे दमाने घ्यावे, सबुरीने घ्यावे. सुरुवातीला मला हा प्रश्न पडायचा की मी एवढे जीव तोडून शिकवते तर मुलांना समजत कसे नाही, हा विषय एवढा अवघडही नाही. का बरे यावरती विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर त्यांना देता येत नाही. थोडा मुलांचा रागही यायचा. मग मीच माझ्यात काही सुधारणा केल्या. सर्वप्रथम मी माझा संयम वाढवला. एकच टॉपिक दोन तीनदा समजावून देताना जणू प्रथमच शिकवत आहे तेवढ्याच उत्साहाने सांगत राहते. कधी यश मिळते तर कधी एखादे लेक्चर मलाच आवडत नाही. तासाच्या शेवटी मुले कंटाळली की समोर बसलेल्या विद्यार्थ्यांमधून एखादी विद्यार्थिनी मला गोष्ट सांगा असे सुचवते. मग तांत्रिक विषयातील काही कथा मी ऐकवते, उत्पादन वाढीबद्दल आम्ही चर्चा करतो, काहीवेळा तर भारतातील किंवा जगातील घडामोडींबद्दलही वादविवाद होतात. क्वचित मी मला आवडणारी एक ॲक्टिव्हिटी घेते ती म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला सुडोकू सोडवायला देणे. जो सर्वप्रथम सोडवतो त्याला चॉकोलेट बक्षीस मिळते. त्यामुळे मुलेही खुश आणि मी पण खुश.

माझ्या शिक्षकी पेशाच्या सुरुवातीच्याच दोन तीन वर्षातील घटना. मी अगदीच नवखी होते. अजून एक बॅच सुद्धा माझ्याकडून शिकून बाहेर पडली नव्हती. माझ्या परीने मी चांगल्यात चांगले शिकवावे याची तयारी करत होते. दुपारची वेळ होती. आमच्या स्टाफ रूममध्ये एक नुकताच इंजिनियर झालेला माजी विद्यार्थी आला. बाकीच्या शिक्षकांशी बोलत होता. कुणीतरी त्याला माझी ओळख करून दिली. माझ्याकडे बघत तो म्हणाला "ओह, तुम्हीच पाटसकर मॅडम का? मी तुमच्या बद्दल खूप ऐकले आहे, तुम्ही खूप छान शिकवता म्हणून". मला वाटते की माझी स्वतंत्र ओळख त्या क्षणापासून सुरु झाली. मला कोण आनंद झाला होता त्या दिवशी! मला अजून हुरूप आला. अशीच काही वर्षे गेली. पुणे युनिव्हर्सिटीमध्ये माझी चांगली ओळख निर्माण झाली होती. तसा मी शिकवत असलेला विषय फार अवघड नाही पण फार इंटरेस्टिंग आहे. सुरुवातीला फळा, खडू आणि डस्टर हेच साहित्य शिकवण्यासाठी वापरले जायचे. मग पुढे पारदर्शक प्लास्टिक कागदांचा उपयोग करून शिकवण्याचे तंत्र आले. त्या पारदर्शक कागदावर म्हणजेच ट्रान्स्परन्सीवर मार्कर पेनाने लिहायचे आणि ते पांढऱ्या भिंतीवर किंवा पडद्यावर प्रतिबिंबित करायचे. त्यासाठी एका काचेच्या पेटीत दिवा ठेवून त्यावर ट्रान्स्परन्सी ठेवली जायची. मुलांना मोठ्या स्क्रीनवर ते छान दिसायचे, शिवाय मलाही ते बरे पडायचे. काही मोठ्या गणितांसाठी एकदाच अश्या ट्रान्स्परन्सीज तयार केल्या की वेळ वाचायचा. मग त्यावर अनेक प्रयोग होऊ लागले. एकाच वेळी दोन तीन ट्रान्स्परन्सीज ठेवून विषय समजावून देणे सोपे व्हायला लागले. बरोबरच्या शिक्षकांशी यातीलच एखादी नवीन क्लुप्ती शेअर करायला लागले. "मुलांना कसे शिकवावे" थोडक्यात अध्यापन-अध्ययन प्रक्रिया समजावून घेण्यासाठी अनेक वर्कशॉपला जायला लागले. याच दरम्यान अध्यापकांच्या शैक्षणिक अर्हता वाढवण्यासाठी कॉलेज व्यवस्थापनाकडून प्रोत्साहन मिळू लागले. पदव्युत्तर शिक्षण अस्वस्थही व्हायचे. मात्र मुलांची एनर्जी माझ्यापर्यंत पोहोचतही होती. केवळ मुलांसाठी असलेल्या अनेक समित्यांमधून मी काम पाहत होते याचा फायदा मला शिकवताना सुद्धा झाला. आता मला बऱ्यापैकी शिकवता येते असे मी स्वतःबद्दल म्हणू शकते. कालांतराने माझी मुले मोठी झाली. दिवसभरच्या घडामोडी रात्री जेवताना सांगताना मुलांची दुसरी बाजूही कळू लागली. केवळ शिकवतानाच नाही तर वर्गाबाहेर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना याचा मला खूप उपयोग झाला. समाजाच्या अनेक स्तरांवरून येणारी ही मुले, कुणी गरीब तर कुणी थोडे आगाऊ, कुणी सदा उत्साही तर कुणी सतत गंभीर, कुणी हुशार तर कुणाचे विषय राहिलेले, कुणी जवळपास राहणारे तर कुणी आई वडिलांपासून लांब होस्टेलवर राहणारे. मला कित्येकांच्या गावांची नावे माहीतही नसतात, पण एकच गोष्ट खरी असते की सर्व विद्यार्थी चांगलीच असतात. त्यातील कुणी थोडीफार बिघडलेली असू शकतात पण एका मर्यादेच्या बाहेर ती जात नाहीत, निदान कॉलेज मध्ये असे घेणे अनिवार्य ठरले. त्यावेळी मी शिक्षक आणि विद्यार्थी या दोन्ही भूमिकेत आले आणि माझ्या विद्यार्थ्यांकडे मी अजून वेगळ्या चष्म्यातून बघायला लागले.

हळूहळू माझे वय वाढले, कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या आणि माझ्या वयात अंतर वाढत गेले. जनरेशन गॅप मुळे काही वेळा मी पर्यंत तरी. कोणत्याही विद्यार्थ्याला एखादे काम दिले तर ते चोख होऊ शकते याची खात्री असते. सध्या अधिष्ठाता, विद्यार्थी कल्याण या पदावर असल्याने माझा सर्वात जास्त वेळ मुलांबरोबर जातो. त्यांच्यातील एनर्जी बघून थक्क व्हायला होते. अनेकानेक कल्पना त्यांच्या मनात असतात. आपण फक्त त्यांना टेकू द्यायचा असतो. मात्र अजूनही हे तंत्र मी शिकत आहे आणि बहुधा माझ्या निवृत्तीपर्यंत मी शिकतच राहणार आहे.

माझ्या गेल्या एकतीस वर्षांच्या शैक्षणिक कार्यकीर्दीत अनेक विद्यार्थी हाताखालून गेले. आजही माझे कित्येक विद्यार्थी मला भेटण्यासाठी म्हणून कॉलेजला येतात.. माजी विद्यार्थी भेटले की खूप आनंद होतो, सर्वांची नावे लक्षात ठेवणे शक्यच नसते पण तरी त्यातील काहींची आठवतात. काही जण वर्गात तज्ज्ञ वक्ता म्हणून त्यांचे अनुभव सांगायला येतात. मानधन दिले तर नकार देतात, त्यांच्या कॉलेजमधील आठवणी मला सांगत असतात, बाकीच्या शिक्षकांची विचारपूस होते, त्यांच्या बॅचच्या इतर मुलांविषयी चौकशी होते, ते चांगल्या हुद्द्यावर आहेत हे कळल्यावर आनंद होतो. काही वेळा हे माजी विद्यार्थी एकमेकांना बाहेर भेटल्यावर त्यांच्या बोलण्यात माझा विषय निघतो. "मॅडम रागवायच्या पण त्या किती योग्य बोलायच्या याचा प्रत्यय आता येतो" असे ते सांगतात आणि हे ऐकले की माझे कान तृप्त होतात. मला भेटायला आल्यावर माझ्या टेबल वर असलेल्या चॉकलेट्स च्या डब्यातून एक चॉकोलेट आवर्जून घेऊन जातात. भरपूर वेळ गप्पा होतात, आम्ही दोघेही काही वर्षे मागे जातो आणि त्या एकाच वयाचे होतो कारण मी सुद्धा त्याला शिकवताना त्याच्याच वयाची झालेली असते. मग, आहे की नाही मी फॉरेव्हर २०?

**लेखक परिचय**
**डॉ स्मिता पाटसकर**
**स्थापत्य अभियांत्रिकी विभाग**
**डी वाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, आकुर्डी, पुणे**